# बिलीवर्स ईस्टर्न चर्च

मेट्रोपॉलिटन यांच्या कार्यालयातून, सिनड सेक्रेटरीएट, संत थॉमस कॅमुनिटी, तिरुवल्ला, केरळ, भारत.

## मेंढपाळाचे पत्र

सप्टेंबर /ऑक्टोबर२०२३

पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावाने, सर्व आर्चबिशप आणि बिशप, याजक आणि डेकन फादर्स, इव्हँजेलिस्ट आणि ऑर्डर ऑफ सिस्टर्स आणि जगभरातील सर्व बिलीवर्स ईस्टर्न चर्चमधील विश्वासनारे यांना आशीर्वाद आणि अभिवादन. आमेन!✠

ख्रिस्तामध्ये प्रियांनो,

परिवर्तनाच्या या काळात, आम्हाला आठवण करून दिली जाते की आमच्या ऑर्थोडॉक्स ख्रिश्चन जीवनाचे उद्दिष्ट अधिकाधिक देवाच्या दैवी स्वरूपामध्ये रुपांतरित करणे आहे (2 करिंथ 3:18), आणि हे घडण्यासाठी, पश्चात्ताप आवश्यक आहे. या महिन्यात, पश्चात्तापाच्या काही पैलूंकडे आपण थोडे अधिक काळजीपूर्वक पाहू या.

**१. पश्चात्ताप निरंतर आहे.**

चर्चच्या एका सुप्रसिद्ध संताने म्हटल्याप्रमाणे, 'जगण्याचे दोनच मार्ग आहेत: एकतर आपण पाप करू नये किंवा जर आपण पाप केले तर आपण पश्चात्ताप केला पाहिजे. हा मोक्षाचा एकमेव मार्ग आहे. आणि आपल्यापैकी कोणीही पाप करू शकत नाही म्हणून, आपल्यापैकी प्रत्येकाने सतत पश्चात्ताप केला पाहिजे. पश्चात्तापासाठी आपले जुने मार्ग सोडून ख्रिस्ताचे मार्ग स्वीकारण्याची आपली इच्छा असने आवश्यक आहे. जसे पवित्र आत्मा आपल्याला दाखवतो, जिथे आपल्याला बदलण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच, सुरुवातीच्या चर्चच्या वडिलांनी "प्रभु येशू ख्रिस्त, देवाचा पुत्र, माझ पाप्यावर दया कर!" अशी प्रार्थना वारंवार करत होते, आणि जेव्हा आपण असे करतो तेव्हा देव आपल्याला शुद्ध करून प्रतिसाद देतो. संत योहान ह्याचे स्पष्टीकरन देतो: "जर आपण आपल्या पापांची कबुली दिली, तर तो आपल्या पापांची क्षमा करण्यासाठी आणि सर्व अनीतीपासून आपल्याला शुद्ध करण्यासाठी विश्वासू आणि नीतिमान आहे." (1 योहान 1:9).

**२. अप्रामाणिक पश्चात्ताप करणे थांबवा.**

बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या काळात, धार्मिक यहूदी त्यांच्या तारणासाठी आणि शाश्वत सुरक्षिततेसाठी अब्राहमचे वंशज असण्यावर अवलंबून होते. म्हणून, त्यांचा पश्चात्ताप अनेकदा अप्रामाणिक होता आणि परिणामी त्यांच्या जीवनात काहीही बदले नाही. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाकडे इस्रायली लोकांसाठी एक संदेश होता: "आमचा बाप अब्राहाम आहे, असे स्वतःला म्हणू नका, कारण मी तुम्हाला सांगतो की देव या दगडांमधून अब्राहामाला मुले बनविण्यात सक्षम आहे" (संत लूक ३:८). कधीकधी आपण भूतकाळातील आध्यात्मिक अनुभवाचे निमित्त देखील वापरतो, सतत पश्चात्तापाचे महत्त्व दुर्लक्षित करतो.

परिणामी, आपल्या जीवनातील अनेक क्षेत्रांत आपण आध्यात्मिकरित्या वाढ होण्यास अपयशी बनतो; आपल्यासाठी देवाच्या योजना पूर्ण होत नाहीत; देव आपल्याला देऊ इच्छित असलेले अनेक पुरस्कार आपण गमावतो; आणि आपण प्रभू येशू ख्रिस्ताचे या जगात ज्या प्रकारे प्रतिनिधित्व करायला हवे तसे करण्यात अपयशी ठरतो.

**३. खरा पश्चात्ताप: "जुने मार्ग" ख्रिस्ताच्या जीवनाद्वारे बदलवा.**

चहाडी, मत्सर, आळशीपणा, तक्रार करणे, इतरांवर टीका करणे, अप्रामाणिकता, अवज्ञा, अनैतिकता, क्षमाशीलता, स्वार्थीपणा, अधीनता, बंडखोरी, लोभ, तिरस्कार किंवा ढोंग,  कदाचित तुमचे "जुने मार्ग" या यादीत नाहीत, परंतु ते काय आहेत, हे तुम्हाला माहीत आहे.

खरोखर पश्चात्ताप करण्याचा निर्णय घ्या आणि हे गैर-ख्रिस्त मार्ग काढून टाका आणि प्रभू येशू ख्रिस्तामध्ये असलेले जीवन धारण करा, जसे संत पौलने लिहिले: म्हणून आपण अंधाराची कृत्ये बाजूला ठेवू आणि प्रभु येशू ख्रिस्ताला धारण करू या. तुमच्या पूर्वीच्या जीवनपद्धतीच्या संदर्भात, तुम्ही जुने स्वत्व बाजूला ठेऊन नवीन स्वत्व धारण करता, जे देवाच्या प्रतिरूपात, सत्याच्या धार्मिकतेने आणि पवित्रतेने निर्माण केले गेले आहे (रोम 13:12, 14;  इफिस 4 :22, 24).

ख्रिस्तामध्ये असलेल्या माझ्या प्रिय मुलांनो, आपण हे कधीही विसरू नये की तारण ही रोजची प्रक्रिया आहे आणि म्हणुन या आपण 'भीत व कांपत आपले तारण साधुन घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करूया.' (फिल 2:12)

भारतातील मणिपूर मधील आपल्या बंधु भगिनींच्या सुरक्षा आणि शांततेसाठी प्रार्थना करत राहू या.

सर्वशक्तिमान देवाची शांती आणि कृपा तुमच्या पाठीशी सदैव राहो.

पवित्र मंडळीच्या सेवेत,
ख्रिस्तामध्ये तुमचा पिता

अथनेशियस योहान प्रथम मेट्रोपॉलिटन

**तारीख:** १८ ऑगस्ट २०२३
**ठिकाण:** पवित्र सिनड